# पुष्कळ मनधरणी करून अखेरीस खिंडीत गाठली गेलेली बृहन्मुंबई महानगरपालिका शरमेने का होईना पण बृमंमनपाला शहाराच्या विकास आराखड्याच्या प्रक्रियेचे गुपित अखेरीस साऱ्या शहराला जाहीर करावे लागलेच!

— कुणाल पुरोहित

हे विधिलिखित अटळच होते. २६ जुलै, २००९ ह्या दिवशी जारीकेलेल्या घोषणा पत्रकात बृमंमनपाने शहराच्या विकास-आराखड्याचे पुनरावलोकन करण्यासाठी सल्लागारांना आमंत्रित केले. ते करताना त्यांनी एका उपशीर्षकाखाली शहराच्या भावी नकाशाबाबत काही संकल्पना मांडल्या. त्या उपशीर्षकाचे नाव होते, 'दूरदृष्टी आणि धोरणात्मक मुद्दे'. जगातल्या कुठल्याही प्रगत शहराच्या तोडीस तोड असे मुंबईला बनवायचे, इथल्या अर्थव्यवस्थेत जोश आणायचा आणि जगातल्या कुठल्याही प्रगत शहरातल्या जीवनाशी तुल्यबळ असणारी जीवनशैली इथल्या नागरिकांना द्यायची. हे ओझे एकाहाती कसे पेलायचे हा प्रश्न उभा राहिल्याने बृमंमनपाने आपला दृष्टिकोन लोकांसमोर मांडला.
त्या यादीवर चटकन् नजर फिरवली असता असे दिसते की ह्या कामी प्रगती होण्यासाठी इतर काही गोष्टींबरोबरच बृमंमनपाने दोनतीन विशेष गोष्टीही करायच्या ठरवल्या आहेत. त्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत-

अ) वेगवेगळे पर्यायी मार्ग शोधून काढून हाती असलेल्या जमिनीत भर घालणे. त्यासाठी नाविकास क्षेत्रातली जमीन व्यापारी क्षेत्रत किंवा निवासी क्षेत्रात आणणे. ते करताना पुरेसे रस्ते इत्यादी आधारभूत संरचनांमध्येही वाढ करणे.

आ) शक्य तेवढा विकास होण्यासाठी समुद्रात भराव इत्यादी टाकून अधिक जमीन मिळवणे. ते करताना सध्या लागू असलेल्या पर्यावरणीय कायद्यांच्या चौकटीत राहून काम करणे.

इ) मिठागराच्या जमिनींचा अभ्यास करून त्या जमिनीचा निवासी, व्यापारी आणि इतर कामासाठी वापर करता येईल काय ह्याविषयी प्रस्ताव सुचवणे.
चार वर्षांपूर्वीच मुंबईवर निसर्गाचा महाकोप झाला होता. मिठी ह्या मुंबईतील नदीवर अनेक प्रकारे अत्याचार घडल्यानंतर त्या नदीने विकासाच्या नावाने केलेल्या प्रत्येक चुकीविरुद्ध बंड पुकारले होते. त्या घटनेला बरोब्बर चार वर्षे पूर्ण झालेल्या दिवशीच बृमंमनपा वास्तुरचनासल्लागरांना सांगत होती की तुम्ही महत्त्वाकांक्षी विचार करा. आणखी जमीन निर्माण व्हावी ह्यासाठी निसर्गाची आणखी कुठल्या तऱ्हेने पिळवणूक करता येईल ह्याबद्दलविचार करा. त्यावेळेस एकच प्रश्न मनात आला होता की हे घोषणापत्रक निघण्यामागे काय निमित्त घडेल? मुंबईची कशी वाढ व्हावी हे ठरवण्याचे ओझे आम्ही पेलू, हे नोकरशहा आणि अभियंत्यांच्या वेगवेगळ्या विभागातील टोळक्याने स्वेच्छेने का ठरवले? त्यांनी नागरिकांना एकदा तरी त्याबद्दल विचारले होते काय? त्याचे स्पष्ट उत्तर आहे, 'नाही. त्यांनी कधीच विचारले नाही.'

वास्तव हेच आहे की मुंबईतील महत्त्वाच्या प्रकल्पांच्या आखणीसाठी आणि अंमलबजावणीसाठी बृमंमनपा ही मुख्य संस्था जबाबदार आहे. पण त्या संस्थेला एकदाही वाटले नाही की ह्या शहराची वाढ कशा तऱ्हेने होणार आहे हे सांगण्यासाठी एक कोटीहूनही अधिक असलेल्या येथील नागरिकांना विश्वासात घेणे महत्त्वाचे आहे.

त्यावरून खरेतर येथील नागरिकवर्गाला सावधानीचा इशारा मिळायला हवा होता. विधिलिखित तर अटळच होते कारण नगरीचा कच्चा नकाशा काढला गेला होता, काम चालू झालेले होते पण नागरिकांना मात्र त्यासाठी आमंत्रित केले गेले नव्हते.

शहरासंबंधीच्या बृमंमनपाच्या कल्पनांवर भरपूर टीका झाली. त्यावेळी बृमंमनपाने कबूल केले की सर्वसामान्य जनतेशी विचारविनिमय केला जाईल. तसेच शहराच्या विकासाच्या २०१४-२०३४ ह्या काळातील आराखड्याचे पुनरावलोकन करण्याचा कार्यक्रम आखताना आम्ही २ वर्षांच्या काळात नागरिकांची तीन कार्यशिबिरे घेऊ.

नागरिकांनी निषेध व्यक्त करताना म्हटले की, एवढे पुरेसे नाही. त्या कार्यशिबिरांच्या वेळेबद्दलसुद्धा घोळ होता. प्रक्रिया सुरू झाल्यावर चौदा महिन्यांनी पहिले शिबिर घेण्यात येणार होते. म्हणजे सद्यःस्थितीतील जमीनवापराचे नकाशे काढून झाल्यावर आणि त्यावर आधारित जमीनवापरविषयक विश्लेषण केल्यानंतर ते शिबिर होणार होते. १९६६सालच्या महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगरविकास योजना कायद्याकडे बोट दाखवून बृमंमनपाने आम्हांला सांगितले की ते जर कायद्यावर बोट ठेवून वागले तर त्यांना इतकेसुद्धा करण्याची गरज नाही परंतु तरीही ते नागरिकांच्या विचारांना समावून घेत आहेत.

त्यानंतर मग नागरिकांनीही प्रत्युत्तर दिले. दोन महिन्यांच्या अभ्यासानंतर (अर्बन डिझाईन रिसर्च इन्सिट्युट) म्हणजेच 'उद्री' ह्या संस्थेने बृमंमनपाने बनवलेल्या सद्यःस्थितीतील जमीनवापराच्या नकाशात १२०० उणीवा दाखवणारी एक भलीमोठी यादीच सादर केली. सद्यःस्थितीतील जमीनवापराचा नवा नकाशा आणि १९९१साली बनवल्या गेलेल्या विकास योजनेचा आराखडा ह्यांची तुलना करताना ह्या उणिवा नजरेस पडल्या १९९१सालच्या आराखड्याच्या सुधारित आवृत्तीशी तुलना करता आली नाही, कारण तशी आवृत्ती मुळी नव्हतीच. सुधारित विकास आराखडा देण्यास बृमंमनपाने नकार दिल्याने 'उद्री' संस्थेच्या नियोजनकारांनी आणि वास्तुरचनाकारांनी त्याला प्रत्युत्तर म्हणून ठरवले की आपण स्वतःच पुढाकार घेऊन मागील वीस वर्षांत 'बॉम्बे'ची 'मुंबई' कशी झाली ह्याचा अभ्यास करायचा. 'हिंदुस्तान टाईम्स' ह्या दैनिकाने ताबडतोब 'उद्री'ने केलेला तो अभ्यास उचलला आणि त्या अभ्यासातून समजलेल्या परिणामांविषयीचा अहवाल दिला. जमीनवापराच्या नकाशातील उणिवा हा फक्त समस्येचा एक भाग होता. पण समस्येचा दुसरा भाग असा होता की सध्याच्या जमीनवापराचे जे सर्वेक्षण बृमंमनपाने केले होते त्यात बऱ्याच तांत्रिक अडचणीही होत्या. बॉम्बे ते मुंबई असे परिवर्तन घडताना २० चौरस किलोमीटर्सनी शहराचा आकार वाढला होता कारण ह्या वाढीचा नकाशा काढताना बृमंमनपाने मिठागरे आणि तिवरांची वने ह्या शहराच्या नैसर्गिक वैशिष्ट्यांच्या आकारात भरघोस काटछाट केली होतीच पण शिवाय ह्या वाढीच्या कहाणीच्या नकाशात झोपडपट्ट्यांना जेमतेम धरण्याची आवश्यकताही बृमंमनपाला वाटली नव्हती. परिणामतः झोपडपट्ट्या म्हणजे केवळ तपकिरी रंगाचे धब्बे एवढेच त्या नकाशात दाखवले गेले होते.

सामान्यतः प्रसारमाध्यमांवर आरोप केला जातो की ते संकुचिपणे विचार करतात. पण तरीही ह्याबाबतीत प्रसारमाध्यमांनी दूरदृष्टीचा विचार करून हा विषय लावून धरला. हिंदुस्तान टाईम्सने 'शहराचा विकास आराखडा आणि त्यात नागरिकांचा सहभाग' ह्या मुद्यावर चिरस्थायी रूपात एक मोहीमच उघडली. 'उद्री'ने केलेला अभ्यास हा आमच्या अस्तित्वाचाच प्रश्न आहे म्हणून नागरिकांचा सहभाग स्थानिक पातळीवर आणि योजना बनवण्याच्या पातळीवरही हवाच असा आक्रमकतेचा सूर हिंदुस्तान टाईम्सने आळवला. जनमताचा रेटा तयार होण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या मुद्यांचा परामर्ष घेणारी एक लेखमालाच छापली. मग नागरिकांचे अनेक गट आणि सेवाभावी संस्थांनी हातात हात मिळवले आणि ह्या उणिवांविरुद्ध संघटितपणे आवाज उठवायला सुरुवात केली. त्यामुळे काही चुकांना जोरदार प्रसिद्धी मिळाली. उदाहरणार्थ, शहराचा पुरातत्वशास्त्राच्या दृष्टीने असणारा वारसा म्हणजे इथले किल्ले आणि गुहा. पण त्यांचा त्या नकाशात अंतर्भावच केलेला नव्हता किंवा केला असलाच तर तो माहीमच्या किल्ल्यासारख्या झोपडपट्ट्यांची गिचमिड रूपात दाखवला गेला होता.

सध्याच्या जमीनवापराचा नकाशा काढला जात आहे एवढी साधी माहितीसुद्धा नागरिकांना कळवण्याचे कष्टही घेतले गेले नव्हते. इतर शहरांतील विकास आराखड्यांची सुधारणा करताना तिथल्या अधिकारीसंस्था नागरिकांचा सहभाग मागत असतात. त्याचे अनुकरण करावे असे अधिकारी संस्थांना सतत सांगितले जाते. जर बृमुंमनपा आणि तिची सल्लागार कंपनी ग्रोप एससीईई इंडिया प्रा. लि. ह्यांच्या सच्चेपणावर विश्वास ठेवायचा असेल तर हेदेखील मान्य करावे लागेल की सल्लागार कंपनीचे अधिकारी बृमुंमनपाच्या अभियंत्यांच्या सहाय्याने जमिनीच्या प्रत्येक तुकड्याची अगदी बारकाईने पाहाणी करावयास गेले होते. त्यांची त्या कामातली जागरूकता आणि त्या जागरूकतेवर आपल्या मनपाला वाटणारा विश्वास एवढा प्रगाढ होता की ते बनवताना नागरिकांचीही मदत घ्यावी असे त्यांना मुळी वाटलेच नाही. मग ते नकाशे बनल्यावर त्यांची नागरिकांनी खातरजमा करावी असे त्यांना वाटणे ही तर फारच दूरची गोष्ट झाली.

त्यानंतर टीकेचा भरपूर गदारोळ झाला. विकासआराखड्याचे पुनरावलोकन करताना अधिक जबाबदारीने वागण्याची गरज आहे असे वाटणाऱ्या 'युवा' ह्या सेवाभावी संस्थेने त्याविषयी अभ्यास केला. त्या अभ्यासात त्यांना पुढील त्रुटी आढळून आल्या होत्या-

रिकाम्या जागा ह्या मोकळ्या सोडलेल्या जागा म्हणून झोपडपट्टवासीयांनी वस्ती केलेली जमीन, तसेच 'अ' विभागातील महाविद्यालये आणि शिक्षणसंस्था म्हणजे व्यापारी वापरासाठी वापरलेली जमीन असे दाखवण्यात आले होते. कोळ्यांची वस्ती ह्या शहराला 'बॉम्बे' नाव मिळण्याच्या आधीपासूनच येथे आहे. त्या वस्तीचा उल्लेख काही ठिकाणी झोपडपट्टी म्हणून तर काही ठिकाणी अवर्गीकृत म्हणून तर काही ठिकाणी रिकामी जागा म्हणून केला गेला आहे.

संताप आणि टीकेचा वर्षाव झाल्यावर बृमुंमनपाचा त्यावर अधिकृत प्रतिसाद मात्र अगदी बोटचेपा होता. ह्यासंबंधी प्रकाशित झालेल्या लेखांबद्दल बोलताना बृमुंमनपाचे प्रमुख सीताराम कुंटे म्हणाले, की शहराच्या विकास आराखड्यात नागरिकांना सामील करताना काही आंतरराष्ट्रीय निकष लावावे लागतात. हे वेगवेगळ्या शहरांना भेटी देताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे. तसेच त्यांनी जनतेला वचन दिले की जमीनवापराच्या नव्या नकाशाचा मी स्वतः जातीने आढावा घेईन आणि नागरिकांना त्या नकाशांवरून नजर फिरवण्यास अनुमती देईन.

नागरिकांना साधारण एका महिन्याचा अवधी दिला जाईल. त्या नकाशात चुका आहेत किंवा कसे हे तेवढ्या अवधीत नागरिकांना नक्कीच समजेल.

अगदी त्याच सुमारास विकासनियोजन विभागाचेएक अधिकृत स्पष्टीकरण सर्वत्र पाठवले. त्यात असे म्हटले होते की ह्या नकाशात कसल्याही चुका नाहीत. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुका होणार नाहीत म्हणून कसून मेहेनत केल्यामुळे त्यात चुका असण्याची शक्यताही नाही. पण त्याच सुमारास शहरातल्या 'उद्री'सकट वेगवेगळ्या गटांनी जमिनीच्या वेगवेगळ्या तुकड्यांची प्रत्यक्ष जागी पाहाणी करून ते योग्य तऱ्हेने चिन्हांकित केले आहेत की नाही हे पाहाण्याची जबाबदारी घेतलेली होती. त्यानंतर काही आठवड्यांनी विकास नियोजन विभागाने पुन्हा पलटी मारली. त्यामुळे त्यांच्यावर भरपूर टीका झाली. तेव्हा शहराच्या खजिन्याच्या किल्ल्या ज्या स्थायी समितीकडे असतात त्या स्थायी समितीचे प्रमुख राहूल शेवाळे ह्यांनी विकास नियोजन विभाग आणि त्याच्याशी झगडणारे नागरिकांचे गट ह्यांची एकत्र बैठक बोलावली. त्यावेळेस नागरिकांनी केलेल्या भडिमारामुळे ह्या विभागाने ताबडतोब घूमजाव करून पुन्हा स्पष्टीकरण दिले की सध्याच्या जमीनवापराच्या नकाशाच्या नागरिकांनी केलेल्या छाननीतून आलेल्या निष्कर्षांबद्दल आम्हाला संपूर्ण आदर आहे. तथापि, ते बोलणे संपायच्या आतच त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेवाळेंना असेही सांगितले की ह्यातील बहुतेक चुका म्हणजे खरं तर योग्य नकाशारेखनच आहे पण ते फारच तांत्रिक स्वरुपाचे असल्याने ह्या बिचाऱ्या सामान्य नागरिकांना ते समजत नाही. त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्या विभागाच्या प्रमुखांनी हिंदुस्तान टाईम्सच्या वार्ताहरांना सांगितले की ह्या चुका काही फार महत्त्वाच्या नाहीत.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरांमध्ये लोकांच्या सहभागाचा दर्जा केवढा उच्च असतो असे एकीकडे म्हणत असताना दुसरीकडे मात्र प्रत्यक्ष शोधून काढलेल्या चुकांबद्दल म्हणायचे की सामान्य जनता तंत्रज्ञानाविषयी अडाणी असल्याने त्यांना ह्या चुका झाल्या असे वाटते. त्याच वेळेस नागरिकांच्या अनेक गटांनी मेहेनत घेऊन काढलेल्या निष्कर्षांबद्दल म्हणायचे, 'त्यात काय विशेष?' अशा तऱ्हेचा बृमुंमनपाचा दृष्टीकोन बरेच काही सांगून जात असला तरीसुद्धा विधिलिखित हे तर अटळच असणार होते. कारण लोकांचा सहभाग म्हणजे लोकांनी केलेली ढवळाढवळ असे जर मानले जाणार होते तर तसेच घडणार होते.

वीस वर्षांसाठी लागू असणारा आणि ज्याचा परिणाम पुढील कित्येक वर्षांवर होणार होता असा विकास आराखडा तर तयार केला जात होता. पण तो तसा तयार होत असताना नागरिकांना मात्र मुळीच विश्वासात घेतले गेले नव्हते. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय दर्जांच्या शहरांच्या नियोजनात नागरिकांचे सक्षम गट सक्रिय सहभाग घेतात ह्याच्या केवळ कथा ऐकायला इथल्या नोकरशहांना आवडते. ते त्या शहरांतून प्रत्यक्ष फिरूनसुद्धा येतात. पण तेच परिणाम इथेही साधण्यासाठी ती पावले इथेही उचलण्याचे धैर्य काही त्यांना होत नाही. अगदी कुरकुरत का होईना, पण बृमुंमनपाने सामान्य जनतेला तपासून बघण्यासाठी म्हणून एक महिन्याभरासाठी हे नकाशे खुले केले तेव्हाही त्या मार्गामध्ये अनेक अडथळे उभे होते. जे नकाशे त्यांनी नागरी संपर्कस्थळावर टाकले होते त्यांचा अर्थ लावण्यासाठी नागरिकांनी तंत्रज्ञानात अत्यंत कुशल असणे गरजेचे होते. नाही तर मग त्यांना आपल्या स्थानिक विभागाच्या मनपा कार्यालयात जाऊन सूचनाफलकावर लावलेला ए३ आकाराचा सध्याच्या जमीनवापराचा नकाशा पहावा लागत

होता. 'तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अडाणी असलेल्या' सामान्य नागरिकांना समजण्यासाठी म्हणून त्या नकाशासोबत इतर कसलीही माहिती दिली गेली नव्हती. जर त्या प्रती मिळाल्या असत्या तर आपल्या परिसरात तो नकाशा घेऊन फिरताना त्यांना नकाशात काही चुका झाल्यात का तेतरी शोधता आले असते. ज्या लोकांना इंटरनेटचा वापर करता येत नाही, पण तरीही त्यांना ह्या नकाशांची छाननी करायची असेल तर? किंवा अगदी ज्या लोकांना हे नकाशे पहाणेसुद्धा समजत नसेल पण तांत्रिक ज्ञान नसूनही नकाशे समजून घेण्याच्या संधीचा फायदा घेण्याचा तीव्र निर्धार त्यांनी केला असेल तर? दुर्दैवाने ह्या गटातील नागरिकांना गमावण्याचा धोका आपण पत्करतो. पण आपल्या राज्यकर्त्या आणि प्रशासनयंत्रणेतील वर्गाच्या आपल्याला सक्षम करण्याच्या नेभळट निर्धारापुढे मात्र आपण मान तुकवतो.

तुलनेने पाहाता इतर अनेक देशातील नागरिकांच्या सक्षमतेची पातळी आपल्यापेक्षा कितीतरी जास्त आहे आणि ती पाहता आपल्याला शरमेने खाली पाहाण्याचीच वेळ येईल. अमेरिकेतील 'केंटुकी' राज्यातील 'लुईसव्हिले' ह्या शहराचेच उदाहरण घ्या, मुंबईप्रमाणेच लुईसव्हिले हे शहरसुद्धा आपली वाढ आणि विकास ह्यांचा पुढील २५ वर्षांचा रस्ता कसा असावा ह्याचा नकाश काढण्यासाठी झगडते आहे. लुईसव्हिले येथील राजकारणी वर्गापासून (त्या शहराचे महापौर ग्रेग फिशर हे ह्या अभ्यासातील एक सक्रिय कार्यकर्ते आहेत.) ते प्रशानसयंत्रणेपर्यंतच्या लोकांनीत्यासाठी एक कार्यक्रम आखलेला आहे. त्याचे नाव आहे, 'व्हिजन लुईसव्हिले'. ह्या कार्यक्रमाद्वारे त्यांनी ह्या शहराच्या भावी विकासाच्या नियोजनप्रक्रियेत तेथील नागरिकांचा सक्रिय सहभाग असावा ह्या दृष्टीने पावले उचलली आहेत. तुम्ही जर संस्थेच्या www.visionlouisville.com ह्या स्वतंत्र संपर्कस्थळावर गेलात तर फिशर त्याविषयी काय म्हणतात ते तुम्हाला सहज वाचता येईल. ते म्हणतात, 'येत्या २५ वर्षांमध्ये आमचे शहर कसे दिसेल त्यासाठी आम्ही आमची एकत्रित उर्जा, बुद्धिमत्ता आणि कल्पना कशी कामी लावतो त्यावर सारे अवलंबून आहे. हे अर्धशतक पूर्ण होताना लुईसव्हिले आम्हांला कसे दिसायला हवे आहे, तेथील वातावरण किती चांगले असायला हवे आहे आणि हे शहर कुठल्या दिशेने वाढायला हवे आहे ह्याचा आम्ही भविष्यातील मार्ग कसा रेखाटतो ह्यावर सारे अवलंबून आहे.'

एवढ्या मोठ्या प्रमाणात आणि परिणामात केलेला अभ्यास आम्हाला कधीतरी घायला मिळेल काय? आमचा राजकरणी वर्ग आम्हाला सक्षम करण्यासाठी धडपडेल काय? आम्ही त्या नियोजनात सक्रिय सहभागी व्हावे आणि भविष्यासाठी आम्ही आमच्या कल्पना सांगाव्यात म्हणून आम्हाला उत्तेजन देईल काय? पण तसे न होता आमची नोकरशाही नागरिकांचा पाणउतारा करते. त्यांना सक्षम करण्यासाठी कुरकुरतच दुर्बळ प्रयत्न करते आणि मग त्या प्रयत्नांच्या गांभीर्यावर पाणी ओतण्यासाठीच जणू काही 'त्यात काय विशेष?' असा शेरा मारते. जेव्हा जनतेशी सल्लामसलत हा प्रकारच रद्दबादल ठरवला जातो आणि फक्त वेगवेगळ्या विभागातले नोकरशहा (जे त्यांच्या वरिष्ठ नोकरशहांच्या गटाशिवाय दुसऱ्या कुणालाही उत्तर द्यायला बांधील नसतात.) असे नोकरशहा ठरवतात की त्यांचा शब्द म्हणजेच ह्या देशातील कायदा आहे, तेव्हा, मग तो एक धोक्याचा मोठा इशाराच ठरतो. हा धोक्याचा इशारा केवळ नागरिकांसाठीच नसतो तर ह्या नागरिकांचे प्रतिनिधीत्व आम्ही करतो असा दावा करणाऱ्या राजकारण्यांसाठीसुद्धा तो असतो. विकास नियोजन विभागाने खरेतर आपल्या योजनेचे पुनरावलोकन करण्यासाठी सुधारणा

समितीच्या हाताखाली काम करणे अपेक्षित होते. पण तसे न करता त्या विभागाने काम पुढे रेटले आणि सध्याच्या जमीन वापराचे नकाशे राज्यसरकारच्या शहरनियोजन खात्याकडे पाठवले. (नागरिकांच्या गटांसोबत झालेल्या बैठकीत विकासनियोजन विभागाने तसा दावा केला.) ते करताना त्यांनी २६लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सुधारणा समितीला त्याबद्दल यत्किंचितही सुगावा लागू दिला नाही.

जनमताचा रेटा वाढल्यावर ह्या नकाशांची छाननी करण्याची निर्धारित कालमर्यादा आणखी एका महिन्याने वाढवण्यात आली. शेवटल्या मोजणीच्या वेळेस अनेक नागरिकांना आणि त्यांच्या गटांना बृमुंमनपाच्या विकास नियोजन विभागाने आखलेल्या ह्या नकाशांत एकूण २००० चुका मिळाल्या. ह्यातील धडकी भरवणारे वास्तव असे की, शहराच्या आराखड्यातील ह्या चुका नागरिकांनी दाखवीपर्यंत कुणाच्याही लक्षातसुद्धा आल्या नव्हत्या. नागरिकांना खरी सत्ता मिळावी आणि सार्वजनिक लोकहिताच्या बाबींत त्यांच्या म्हणण्याला वजन प्राप्त व्हावे म्हणून आता काय प्रसारमाध्यमांनी शासनयंत्रणेतील नोकरशहांच्या कानाला पिस्तुलाचा चाप लावून त्यांना शरमिंदे करावे की काय? हिंदुस्तान टाईम्सने त्या संदर्भात अनेक लेख प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी वेगवेगळ्या जमिनींच्या तुकड्यांची छायाचित्रे छापली. त्या तुकड्यांचे वर्गीकरण करताना नकाशात चुका झाल्या होत्या. काय चूक झाली आणि प्रत्यक्ष वर्गीकरण काय असायला हवे होते ते त्या लेखांत छायाचित्रासमवेत दिलेले होते.

त्यामुळेच असे वाटते की जनतेने जर छाननी केली नसती तर ह्या चुका लक्षात न येता आणि त्यामुळेच दुरुस्तही न होता तशाच राहिल्या असत्या असे मानायला भरपूर जागा आहे. बृमुंमनपाच्या योजनेनुसार नागरिकांना आवाज केव्हा उठवता आला असता जेव्हा बृमुंमनपा हे नकाशे आणि त्यांचे विस्तृत विश्लेषण आपल्यापुढे सादर करणार होती तेव्हाच. पण एकदा का ह्या नकाशांचे विश्लेषण तयार झाले असते की त्यानंतर बृमुंमनपा पुन्हा नकाशे काढण्यापर्यंत मागे जायला तयार झाली असती का आणि त्या नकाशातल्या चुका त्यांनी दुरुस्त केल्या असत्या का? कारण मग त्या चुकांवरती आधारित विश्लेषणसुद्धा चुकलेलेच असते. नागरिकांना सक्षम करण्यासाठी मनापासून प्रयत्न न करणे आणि सारख्या पलट्या मारण्याचे धोरण अंगिकारणे हे पाहून असे वाटते की त्यांनी नक्कीच तसे काहीही केले नसते.